## दोन-चार वेदनांचे

दोन-चार वेदनांचे
सल भिजत पडलेले
शब्द बनून येतात बाहेर
कधी काळी अडलेले

साधे साधे व्यक्त होणे
बनते थोर भावना..
डोळ्यातल्या थेंबाचा पूर होईल,
कधी वाटले होते का, सांग ना?

लाख डाग देऊन जाते
तुझी एक आठवण
पण शब्दात ओवलं दुःख -
कि तेच बनतं चंदन

तू सोडून गेलास तरी
शब्दांची कायम साथ आहे
खूप एकटी वाटली जरी
कवितेनं भरलेली रात आहे...

**© प्रीती देशपांडे**

**www.meetipreeti.com**